Estd. 1962
'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

५०/२०२६

**विषय :** पदवीधर व शिक्षक मतदारसंघांच्या द्विवार्षिक निवडणूक-2026 मध्ये मतदानाचा हक्क बजावण्यासाठी विशेष नैमित्तिक रजेबाबत.

**संदर्भ :** मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयाचे दि.०१/१०/२०२६ रोजीचे पत्र

शिवाजी विद्यापीठातील सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, रेक्टर्स. प्रशासकीय अधिकारी, सेवक व विद्यार्थी/विद्यार्थीनी व संलग्नित सर्व महाविद्यालये, मान्यता प्राप्त संस्थेमधील संचालक, प्राचार्य, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक व विद्यार्थी/विद्यार्थीनी यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या पदवीधर व शिक्षक मतदारसंघांच्या द्विवार्षिक निवडणूक-2026 च्या अनुषंगाने दिनांक 23 ऑक्टोबर 2026 रोजी मतदान होणार आहे.

सदर **निवडणुकीमध्ये संबंधित मतदारसंघातील मतदार यादीत नाव नोंदविलेल्या विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, सेवक व विद्यार्थी/विद्यार्थीनी यांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार मतदारांना दिनांक 23 ऑक्टोबर 2026 रोजी विशेष नैमित्तिक रजा जाहीर केलेली आहे.**

या अनुषंगाने संबंधितांनी मतदार असल्याचे कागदपत्र जोडून विशेष नैमित्तिक रजा मागणी अर्ज विभाग प्रमुखमार्फत संबंधीत आस्थापना विभागास सादर करावा.

(डॉ. व्ही. एन. शिंदे)
**कुलसचिव**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

जा. क्र. आस्थापना / 2211
दि. 21 OCT 2026

**प्रति,**

१) मा. कुलगुरु, मा. प्र.-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. अधिष्ठाता, मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, सर्व संचालक यांचे कार्यालय
२) सर्व अधिविभागप्रमुख, समन्वयक, शिक्षक, रेक्टर, प्रशासकीय अधिकारी, सेवक
३) संलग्नित सर्व महाविद्यालये, मान्यता प्राप्त संस्था
४) इंटरनेट विभाग – सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

**अधिविभाग/प्रशासकीय विभाग प्रमुख यांनी सदरचे परिपत्रक सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक यांचे निदर्शनास आणावे.**